महाराष्ट्र टाइम्स
पुणे TIMES

# आज फुलणार प्रेमकथा

**राधा-कृष्ण यांच्या पार्श्वभूमीवर फुलणारी आधुनिक प्रेमकथा 'मीट मी ऑन द मेडो' या सांगीतिक नृत्यनाटिकेतून आज फुलणार आहे.**


श्रेयाशी नाग


पुणे टाइम्स टीम

नृत्य-नाटिका, साधी कथा, गीतगायन किंवा चित्रकला या माध्यमातून राधाकृष्णाची कहाणी आपल्यासमोर येत असते. कोणत्याही माध्यमातली त्यांची कहाणी रंजकच वाटते. भारतीय संस्कृतीत अजरामर झालेल्या राधा-कृष्ण यांच्या पार्श्वभूमीवर फुलणारी आधुनिक प्रेमकथा भव्य-दिव्य स्वरूपात अनुभवण्याची संधी रसिकांना पुन्हा मिळणार आहे. 'रेणू आर्ट फाउंडेशन' आणि 'महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब'च्या सहकार्यानं 'मीट मी ऑन द मेडो' या सांगीतिक नृत्यनाटिकेचं (बॅले) आज (दि.२३) आयोजन करण्यात आले आहे. संध्याकाळी ७.३० वाजता कोथरूड इथल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात या कार्यक्रमाचा पहिला प्रयोग पुणेकरांसमोर होतोय.

या कार्यक्रमाची संकल्पना, निर्मिती आणि दिग्दर्शन आर्किटेक्ट अनिता कुलकर्णी यांचं आहे. हा बॅले दीड तासाचा असून, भारतीय नृत्यसंगीताचं भव्यदिव्य स्वरूपातलं सादरीकरण त्यात अनुभवता येणार आहे. मल्टी-मीडियाचा वेगळ्या पद्धतीनं वापर हे याचं वैशिष्ट्य. राधा-कृष्णाच्या पार्श्वभूमीवर फुलणारी ही आधुनिक प्रेमकथा एक संदेशही देते. सध्या हा बॅले इंग्रजीत असून, लवकरच तो भारतीय आणि परदेशी भाषांमध्येही सादर होणार आहे.

महाराष्ट्र टाइम्स CULTURE Club

'मेडो'मध्ये प्रसिद्ध बंगाली कथक नृत्यांगना श्रेयाशी नाग प्रथमच पुणेकरांसमोर कला सादर करणार आहे. भरतनाट्यम् नृत्याविष्कार परिमल फडकेही यामध्ये सहभागी होणार आहेत. बॅलेचं संगीत सत्यजित केळकर, आमोद कुलकर्णी आणि चिन्मय कोल्हटकर यांनी केलंय. मकरंद ब्रह्मे यांनी या बॅलेसाठी मार्गदर्शकाची भूमिका बजावली आहे. नृत्यसंगीताच्या पार्श्वभूमीवर डिजिटल पडद्यांची रचना चेतन देशमुख यांची आहे. प्रदीप वैद्य आणि जयदीप आपटे यांनी प्रकाशयोजना केली आहे. नृत्यसंगीताच्या पार्श्वभूमीवर डिजिटल पडद्यांची आकर्षक रचना यामुळे हा कलाविष्कार एका वेगळ्याच विश्वाचा अनुभव रसिकांना देतो.


परिमल फडके

'महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब' सभासदांना या कार्यक्रमाच्या मोफत प्रवेशिका दिल्या जाणार आहेत. या प्रवेशिकांसाठी सदस्यांनी नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरील (फर्ग्युसन रोड) 'महाराष्ट्र टाइम्स'च्या कार्यालयात सकाळी ११ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा. इतरांसाठीच्या सशुल्क प्रवेशिका यशवंतराव चव्हाण नाट्यगृह इथं सकाळी ९ ते १२ आणि संध्याकाळी ५ ते कार्यक्रम सुरू होईपर्यंत या वेळेत उपलब्ध आहेत.

'महाराष्ट्र टाइम्स' कल्चर क्लब सभासदत्वाचं नूतनीकरण करण्यासाठी किंवा नव्याने सभासद होण्यासाठी ९६५७०३२६०९ या क्रमांकावर किंवा www.mtcultureclub.com या वेबसाईटवर लॉगइन करा.

**फेसबुक लिंक :** https://www.facebook.com/MTCultureClub
**ट्विटर लिंक :** https://twitter.com/MTCultureClub

**टिप : कल्चर क्लबच्या वेबसाइटवर जाण्यासाठी हा कोड तुमच्या मोबाइलवर स्कॅन करा.**

सकाळ
पुणे, शुक्रवार
२६ मे २०१७
५



यशवंतराव चव्हाण नाट्यगृह : 'मीट मी ऑन द मेडो' ही नृत्यनाटिका सादर करताना श्रेया नाग आणि परिमल फडके.

# नृत्यनाटिकेत विविध कलांचा संगम

पुणे, ता. २५ : नृत्य, संगीत, काव्य, चित्रकला, रेखाटने अशा विविध कलांचा संगम असलेली 'मीट मी ऑन द मेडो' ही प्रेम कथेवर आधारित सांगीतिक नृत्यनाटिका नुकतीच प्रेक्षकांसमोर सादर झाली. बंगालच्या कथक नृत्यांगना श्रेया नाग यांनी ती वैविध्यपूर्ण नृत्य आणि वैशिष्ट्यपूर्ण अभिनयातून रंगवली.

त्यांना नृत्य कलाकार परिमल फडके यांनी या वेळी साथ केली. रेणू द फाउंडेशन फॉर आर्टस या संस्थेने आयोजित केलेल्या या नृत्यनाटिकेचे अनिता कुलकर्णी यांनी दिग्दर्शन केले होते. या कलाविष्काराला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

महाराष्ट्र टाइम्स
पुणे TIMES
ADVERTORIAL, ENTERTAINMENT PROMOTIONAL FEATURE
पुणे, मंगळवार, ३० मे २०१७

# संगीतिकेचा मन:स्पर्शी आविष्कार

पुणे टाइम्स टीम

'मीट मी ऑन द मेडो' या इंग्रजी संगीतिकेचा पहिला प्रयोग यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात नुकताच झाला. 'रेणू- द फाउंडेशन फॉर आर्ट्स' या संस्थेतर्फे आयोजित या कार्यक्रमाचा 'महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब'चं कल्चरल पार्टनर आहे.

अनिता कुलकर्णी यांनी या नृत्यनाटिकेचं दिग्दर्शन आणि निर्मिती केली आहे. राधा-कृष्णाचं अतूट प्रेम आणि त्यातला कालातीत संदेश कथक नृत्यांगना श्रेयसी नाग आणि भरतनाट्यम नर्तक परिमल फडके यांनी आपल्या सादरीकरणातून समोर आणत श्रोत्यांना खिळवून ठेवलं. उत्कृष्ट रंगाविष्कार असलेल्या डिजिटल भिंतींचं अभिनव भव्यदिव्य नेपथ्य हे या संगीतिकेचं वैशिष्ट्यं ठरलं. नेत्रदीपक रंगांची उधळण, मनस्पर्शी कथानक आणि वेधक अदाकारी यामुळे कार्यक्रमाचं चित्र बराच वेळ प्रेक्षकांच्या मनात राहिलं.

दीड तासाच्या ध्वनिमुद्रित साउंड ट्रॅकच्या आधारे या नाटिकेचं कथानक उमलत जातं. अभिजात भारतीय शास्त्रीय नृत्य (कथक-भरतनाट्यम) आणि संगीताचा नवा साज- बाज घेऊन ही प्रेमकथा फुलते. अनिता कुलकर्णी आणि जयदीप वैद्य यांचं संगीत, तसंच बासरी, सतार, तबला, गिटार, ड्रम्स या वाद्यांचा आविष्कार यामुळे हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.

काव्य आणि चित्र यांचीही गुंफण यामध्ये होती. या निर्मितीसाठी मकरंद ब्रह्मे, चेतन देशमुख, प्रदीप वैद्य, आमोद कुलकर्णी, चिन्मय कोल्हटकर, सत्यजित केळकर या कलाकारांनी अनुक्रमे मल्टिमीडिया, छाया-प्रकाशयोजना आणि संगीत यांची जबाबदारी उत्तम पेलली. वेशभूषा नियोजन अनिता कुलकर्णी यांनी सांभाळली.


परिमल फडके आणि श्रेयसी नाग

'महाराष्ट्र टाइम्स' कल्चर क्लब सभासदत्वाचं नूतनीकरण करण्यासाठी किंवा नव्याने सभासद होण्यासाठी ९६५७०३२६०९ या क्रमांकावर किंवा www.mtcultureclub.com या वेबसाईटवर लॉगइन करा.

महाराष्ट्र टाइम्स CULTUR